साप्ताहिक

# लोकप्रभा

२ एप्रिल ९४ • पाच रुपये



## भारतीय पेयांचा गळा घोटणारे कोला-पेप्सी युद्ध

## लोलो आणि चीची

धर्मगुरु निवडीचा वाद




औषधे पिकवा

## क्रूरकर्मा वीरप्पन

# चतुरस्त्र निवेदक कवी...

सुलोचना देवलकर

*''जंबो जेट जंबो जेट*
*मुंबई– लंडन प्रवास थेट*
*जगलो वाचलो पुन्हा भेट*
*जंबो जेट जंबो जेट... ''*

गाण्याचा ताल क्षणाक्षणाला वाढत जातो. हातात माईक घेतलेला संजय उपाध्ये गातगात संपूर्ण स्टेजभर मुक्तपणे नाचत असतो आणि विशिष्ट जागा आली की प्रेक्षागारात बसलेली दोन–अडीच हजार मुलं त्याच्या सुरात सूर मिसळून उत्स्फूर्तपणे गात असतात, झुईऽऽऽ!

हे दृश्यच विलक्षण थक्क करणारं असतं. एवढ्या प्रचंड समुदायावर, नुसत्या स्वरांच्या साह्याने संपूर्ण नियंत्रण ठेवून त्याला आपल्याबरोबर गायला लावण्याचं अत्यंत कौशल्याचं काम संजय अगदी लीलया करीत असतो. आणि हीच त्याची खासियत आहे. ही 'सहजता' मिळविण्यासाठी त्याने खूप विचार आणि चिंतन केलेलं आहे.

हाती घेतलेल्या कुठल्याही कामात तनमनधन हरपून स्वतःला पूर्णपणे झोकून देण्याचा त्याचा स्वभाव आहे आणि म्हणूनच निवेदन, नाट्यलेखन, गीतलेखन, अभिनय, जादूचे प्रयोग अशा अनेक क्षेत्रात वावरत असताना त्याने आपल्या कामाचा दर्जा कुठेही कमी होऊ दिलेला नाही.

सात–आठ वर्षांपूर्वी निव्वळ योगायोगाने एका मराठी वाद्यवृंदात निवेदन करण्याची संधी त्याला मिळाली. पहिल्याच प्रयत्नाला प्रेक्षकांनी दिलेली उत्स्फूर्त दाद पाहून त्याने निवेदन या क्षेत्रात आपला वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटवायचा असा मनाशी निश्चय केला. प्रेक्षकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी 'आवाज' हे निवेदकाचं प्रमुख शस्त्र असते. म्हणून आवाजाचा उपयोग जास्तीत जास्त प्रभावीपणे करण्यासाठी वेगवेगळ्या स्वरांच्या पट्टीत त्याने घरी निवेदन करून पाहिलं. संस्कृत श्लोकांच्या उच्चारणाने आवाज साफ आणि स्पष्ट केला. निवेदनात वैविध्य आणण्यासाठी वेगवेगळ्या विषयांवरचं विपुल वाचन केलं. त्याच्या जन्मजात विनोदी आणि हजरजबाबी स्वभावाचा त्याला या क्षेत्रात फार फायदा झाला. संजय शीघ्रकवी आहे. तो म्हणतो, 'स्टेजवर दोन गाण्यांच्या मध्ये एखादी कविता लिहून ती लगेच श्रोत्यांना ऐकवण्यात जी मजा आहे त्याचं वर्णन नाही करता येणार!'

संजय सध्या नऊ ते दहा मराठी वाद्यवृंदांमध्ये निवेदन करतो. यात 'हिंदोळे स्वरांचे', 'जीवनगाणी', 'रेशीम गाणी', 'इंद्रधनु', 'मंजुळ गाणी', 'दयाघना' ह्या मुंबईतील आणि 'मोगरा स्वरांचा' आणि 'किनारा' या दोन नाशिकमधल्या वाद्यवृंदांचाही समावेश होतो. 'फिटे अंधाराचे जाळे' या श्रीधर फडके सादर करीत असलेल्या कार्यक्रमाचं निवेदनही संजय करतो. ज्यांनी त्याचं निवेदन प्रत्यक्ष ऐकलेलं आहे ते लोक तो एक उत्तम निवेदक आहे याची ग्वाही देतील. प्रत्येक वेळेस तो वेगळं काहीतरी बोलतो त्यामुळे त्याचं निवेदन नेहमी ताजं टवटवीत वाटतं.



▲ संजय उपाध्ये

''स्टेजवरच्या वावरातील सहजपणा, प्रेक्षकांशी संवाद साधण्यासाठी लागणारा उत्स्फूर्तपणा आणि हजरजबाबीपणा हे गुण जोपासले जादूगार डी. कुमार यांनी! आणि त्यासाठी मी सदैव त्यांचा ऋणी राहीन'' कृतज्ञतापूर्वक संजय सांगतो.

एकदा डी. कुमारांचा जादूचा प्रयोग महापौरांच्या बंगल्यावर होता. स्टेजची मांडणी करण्यापूर्वी प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यासाठी दहा मिनिटं माईक सांभाळण्याची जबाबदारी संजयवर सोपविण्यात आली. तेव्हा त्याने कुठेतरी ऐकलेलं 'जंबो जेट जंबो जेट' हे गाणं तालासुरात म्हटलं. ते सर्वांना इतकं आवडलं की लगेच आंतरशालेय एकांकिका स्पर्धेच्या निकालापूर्वी मुलांच्या मनोरंजनासाठी हेच गाणं पुन्हा म्हणण्याची संधी संजयला मिळाली. कार्यक्रम 'दीनानाथ' सभागृहात होता. दोन– अडीच हजार मुलांना संजयने आपल्या आवाजाने मंत्रमुग्ध केलं होतं. प्रेक्षकांमध्ये सुधीर कवडी बसलेले होते. त्यावेळेस दूरदर्शनवर कवडींची 'पंचतंत्र' ही मुलांची मालिका चालू होती. त्यात काम करण्याची संधी संजयला मिळाली. 'किलबिल', 'पंचतंत्र' यासारख्या कार्यक्रमांतून त्याने नंतर कामही केलं.

'मुलगी झाली हो' या गाजलेल्या एकांकिकेचा प्रयोग संजयने दूरदर्शनवर पाहिला. त्याला तो फारच एकतर्फी वाटला. म्हणून त्याने पुरुषांची बाजू मांडणारी 'मुलगी मुक्त झाली हो' ही एकांकिका लिहिली.

पुरुषांची बाजू मांडणारी ही एकांकिका विनोदी असूनही एखाद्या कट्टर स्त्री–मुक्तीवादी स्त्रीलाही निःशब्द करील एवढी प्रभावी आहे. या एकांकिकेचा पहिला प्रयोग पार्ल्यातील उत्कर्ष मंडळाचे त्यावेळचे कार्यवाह अशोक जोशी यांनी आयोजित केला. आजपर्यंत या एकांकिकेचे अनेक एकपात्री प्रयोग संजयने केलेले आहेत.

पार्ल्यातील 'माध्यम' या संस्थेच्या डॉ. अनिल बांदिवडेकरांनी संजयला प्रथम नाट्यलेखनासाठी प्रवृत्त केलं. राज्यनाट्य स्पर्धेत भाग घेण्यासाठी 'माध्यम'साठी संजयने उषा दातार यांच्या 'काकस्पर्श' या कथेवर आधारित त्याच नावाचं तीन तासांचं नाटक लिहिलं. (नंतर दुसऱ्या लेखकाने लिहिलेलं हेच नाटक 'जन्मगाठ' या नावाने व्यावसायिक रंगभूमीवर आलं). त्यानंतर 'माध्यम' साठीच 'नाट्यदर्पण'च्या 'कल्पना एक आविष्कार अनेक' या स्पर्धेसाठी संजयने 'डेडएंड' या नावाची एकांकिका लिहिली. आशयाच्या दृष्टीने सर्वोत्कृष्ट असलेली ही एकांकिका स्पर्धेत मात्र तिसरी आली. यानंतर संजयने लिहिलेल्या 'कपटपूरचे कटकारस्थान' ह्या विनोदी राजकीय प्रहसनाला मात्र अनेक पारितोषिके मिळाली.

अगदी अलीकडेच 'अश्वमी' थिएटर्सच्या महेश मांजरेकरांसाठी त्यांच्याच कथाबीजावर आधारित 'मी मानसी' हे नाटक संजयने व्यावसायिक रंगभूमीसाठी लिहिलं. पण दुर्दैवाने ज्या ज्या दिवशी नाटकाचा प्रयोग

थिएटरला लागला काही ना काही विपरित घडलं. राजीव गांधींची हत्या, राजकीय पुढाऱ्यांना अटक यासारख्या घटना घडल्या. हे नाटक व्यावसायिक दृष्ट्या यशस्वी ठरलं नाही, एवढं खरं!

त्यापूर्वी महेश मांजरेकरांबरोबर संजयने 'एक शून्य शून्य' या मालिकेच्या काही भागांसाठी लेखन केलं होतं. त्यानंतर बाल गोविंद श्रीवास्तव, विद्याधर पाठारे, विलास सरवणकर, राजन वाघधरे इत्यादी निर्मात्यांसाठी संजयने सहा-सात मालिकांचं लेखन केलेलं आहे. या मालिका कधी दूरदर्शनचा पडदा पाहतील ते मात्र कुणालाच ठाऊक नाही.

संजय एक उत्तम गीतकारही आहे. त्याने लिहिलेली गीते आशा भोसले आणि सुधीर फडके या गायकांनी गायलेली आहेत. गीतलेखनाच्या संदर्भातला एक संस्मरणीय किस्सा संजय सांगू लागतो. ''छत्रपती शिवाजीमहाराज या नावाची एक मालिका दूरदर्शनवर येऊ घातली आहे. या मालिकेसाठी रामदास स्वामींनी लिहिलेल्या काही श्लोकांना श्रीधर फडके चाल लावीत होते. रामदास स्वामींच्या श्लोकानंतर थोडी गॅप उरत होती. ती पूर्ण भरून काढण्यासाठी अजून काही श्लोकांची आवश्यकता होती. नवीन श्लोक शोधायला वेळ नव्हता. मला बसल्या जागी 'स्वराज्य संस्थापक स्वधर्म उद्धारक स्वजन प्रतिपालक ऐसा राजा' ही ओळ सुचली. ही ओळ रामदास स्वामींच्या आधीच्या श्लोकात इतकी चपखल बसली की ती मी लिहिलेली आहे हे कुणाच्याही लक्षात आलं नाही. बाबासाहेब पुरंदऱ्यांना जेव्हा ही गोष्ट समजली तेव्हा त्यांनी माझी पाठ कौतुकाने थोपटली. हेच श्लोक आशा भोसले आणि सुधीर फडके यांच्यासारख्या महान कलाकारांनी म्हटले आहेत. माझ्या आयुष्यातला हा प्रसंग सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखा आहे.''

संजयने वेगवेगळ्या मराठी गाण्यांच्या ध्वनिफितींसाठी लिहिलेली गीतं सुरेश वाडकर, श्रीधर फडके, उत्तरा केळकर, रवींद्र साठे या नामवंत गायकांनी गायलेली आहेत. आगामी 'विश्वविनायक' या चित्रपटासाठी त्याने लिहिलेल्या गीतांना श्रीधर फडके यांनी स्वरसाज चढविलेला असून आशा भोसले यांनी ही गीतं गायलेली आहेत.

''ग. दि. मा. माझं दैवत आहेत. त्यांनी जसं गीतरामायण अजरामर केलं तशी भगवद्‌गीता गाण्यांच्या रूपात लिहायची असं एक दिवशी माझ्या मनाने घेतलं. झपाटल्यागत मी गाणी लिहू लागलो. अकराव्या अध्यायापर्यंत मी आलो आहे. या गाण्यांना मी 'गीतगीता' असं नाव दिलं आहे आणि या गीतांना योग्य न्याय देऊ शकेल, अशा संगीतकाराच्या मी सध्या शोधात आहे.'' संजय सांगतो.

संजयने स्वातंत्र्यवीर सावरकरांचं संपूर्ण चरित्र ओवीबद्ध केलं आहे. हे चरित्र लिहिण्यामागची प्रेरणा त्याला त्याच्या सासूबाईंकडून मिळाली.

''माझ्या सासूबाई कै. वसुधा नित्सुरे सावरकरांच्या नाटकातले उतारे अभिनयासहित म्हणून दाखवत. एरवी फक्त एक मध्यमवर्गीय गृहिणी असणाऱ्या या स्त्रीने केवळ या एकपात्री कार्यक्रमांतून मिळविलेल्या पैशांनी सावरकर स्मारक निधीसाठी एक लाख रुपये गोळा करून दिले होते. सासूबाईंना सावरकरांची पुस्तकं गोळा करून देत असताना माझ्याही वाचनात त्यांच्यावरची बरीच पुस्तकं आली आणि त्यावरून त्यांचं संपूर्ण चरित्र ओवीबद्ध करण्याची कल्पना मला सुचली. हे लिखाण पूर्ण झालेलं आहे. पण प्रकाशकाअभावी नुसतं पडून आहे.

एका गोष्टीचं मला वाईट वाटतं की इतक्या प्रकाशकांकडे मी गेलो पण एकानेही हे चरित्र नुसतं नजरेखालून घालण्याचीदेखील तसदी घेतली नाही आणि मला वाटेला लावलं. तेव्हाच माझ्या लक्षात आलं की तुम्हाला आधी कीर्ती मिळवायला हवी. तुमचं नाव प्रसिद्ध व्हायला हवं, कारण तुमच्या नावाला कीर्ती असेल तरच तुमच्या नावाचा विचार केला जातो. काहीसा हताश होत संजय म्हणतो. या पुस्तकाच्या विक्रीतून येणारी रक्कम त्याला स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक निधीसाठी देणगी म्हणून द्यायची होती.

हे सगळे उद्योग आणि कॅनरा बँकेतली नोकरी सांभाळत असतानाही संजयला सामाजिक बांधिलकीचा विसर पडलेला नाही. दरवर्षी तो अपंग मुलांसाठी नाटकं लिहितो व स्वतः मेहनत घेऊन ती बसवतो. हे काम तो कोणताही आर्थिक मोबदला न घेता बँकेतून बिनपगारी रजा घेऊन करत असतो. आतापर्यंत त्याने 'अस्मिता' (जोगेश्वरी), 'कमला मेहता अंध मुलांची शाळा' आणि पुनर्वास विद्यालय (मंद बुद्धी मुलांची शाळा) या शाळांसाठी नाटकं लिहून त्यांचं दिग्दर्शन केलं आहे.

अंध मुलींचं नाटक बसवताना त्याने स्टेजवर दोन आडव्या आणि दोन उभ्या दोऱ्या बांधल्या. दोऱ्यांच्या जॉइंटपासून काही अंतरावर माईक, टेबल अशा गोष्टी ठेवल्या. नॉयलॉनच्या त्या दोरीचा जॉइंट पायाला लागला की उजवीकडे वळल्यावर माईक, डावीकडे वळल्यावर खुर्ची अशा सूचना त्याने अंध मुलींना दिल्या. प्रत्यक्ष प्रयोगाच्या दिवशी ते नाटक त्या मुलींनी इतकं उत्तमरीत्या सादर केलं की सर्वांनी संजयला विचारलं, तुम्ही अंध व्यक्तींना शिकवण्याचा एखादा कोर्स वगैरे केला आहे की काय? यावर त्याचं उत्तर होतं, ''कोर्स वगैरे काही केला नाही पण हृदय आणि मेंदू एकत्र आले की अशा गोष्टी आपोआप सुचू लागतात.''

शिक्षणात आणि खेळातही संजय मागे नाही. चित्रकलेत त्याला उत्तम गती आहे. टेक्स्टाइल डिझायनिंगचा कोर्स त्याने केलेला आहे. याव्यतिरिक्त बी. कॉम. नंतर डी. बी. एम. कॉम्प्युटर सायसेन्समधला डिप्लोमा त्यानंतर एम. ए. आणि आता पीएच. डी.साठी ज्ञानेश्वरीवर संशोधन असं चतुरस्त्र शिक्षणही त्याने घेतलेलं आहे. गेल्या वर्षी सांताक्रूझ जिमखान्यातर्फे तो बॉम्बे लीग बिलियर्डस् टूर्नामेंटदेखील खेळला.

''मी सहा ते सात ट्रॅकस्वर एकाच वेळी काम करीत असतो. इंग्रजीत एक म्हण आहे. If you think you can, you can always think I can. हाती आलेली कुठलीही संधी मी वाया घालवीत नाही. अमुक एक गोष्ट मला जमणार नाही असा मी कधी विचारच करीत नाही.'' अभिमानाने संजय सांगतो.

प्रोग्रेसिव्ह कॅसेट कंपनीतर्फे 'हसवाई' या शीर्षकाची संजयची कॅसेट लौकरच विक्रीला येत आहे. यात तुमडी गीतं, विडंबन गीतं, विनोदी किस्से असा मनोरंजनाचा खजिना असणार आहे.

वेगवेगळ्या क्षेत्रात आजवर मिळालेल्या अनुभवाचा फायदा इतरांनाही करून देण्याच्या उद्देशाने संजयने अलीकडे शनिवार-रविवारी संध्याकाळी ४ ते ६ या वेळात 'पब्लिक ॲपिअरन्स ॲंड कम्युनिकेशन नॉलेज' (PACK) या विषयावरचे क्लासेस घ्यायला सुरुवात केली आहे. या क्लासेसमधून तो इंटरव्ह्यूची तयारी कशी करावी या विषयापासून ते रंगमंचावर धीटपणे कसे वावरावे अशा वेगवेगळ्या विषयाबद्दल मोलाच्या सूचना करतो.

संजयची कथा-पटकथा- संवाद-गीते असलेला मराठी चित्रपट 'सम्राज्ञी' निर्मितीच्या पहिल्या अवस्थेत आहे.

अंगभूत कलांच्या जोडीला दुर्दम्य आशावाद, प्रचंड आत्मविश्वास आणि मेहनत करण्याची तयारी या गुणांची जोडही त्याच्या ठायी आहे. आता फक्त नशिबाची साथ मिळाली तर यश त्याला फार दिवस हुलकावणी देऊ शकणार नाही.

○




# देणं निसर्गाचं ....
# ... लेणं मात्र
# बेडेकरांचच.

आंबा, लिंबू, मिर्ची, करवंद ही तर निसर्गाची देणगीच !

या देणगीच्या नैसर्गिक गुणांचा फायदा वर्षभर आपल्या कुटुंबियांना, मुलाबाळांना मिळण्यासाठी, विविध प्रकारचे मसाले वापरून लोणचं घालण्याची परंपरा खरं तर आपलीच !

पण लोणचं घालायचं तर पुरेसा वेळ हवा याशिवाय अगदी अस्सल पद्धतही माहित हवी तरच लोणचं अगदी आजीनं घातल्यासारखं बनणार !

ही अडचण व्ही.पी. बेडेकरांनी ओळखली आणि आपल्यासाठी बनविला खास

**'बेडेकर लोणच्याचा तयार मसाला'**

व्ही.पी. बेडेकरांनी बनविलेला हा लोणच्याचा तयार मसाला वापरून बनविलेलं लोणचं झणझणीत आणि स्वादिष्ट तर होतच, पण ते टिकाऊ देखील असतं –अगदी घरच्यासारखं.

**व्ही.पी. बेडेकर अँड सन्स प्रा. लि.**

मुंबई-४०० ००४. (स्थापना १९१०)

